'A' Grade
(NAAC Re-Accredited)
($3^{rd}$ Cycle)

।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ

पत्रपेटी क्र. ८०, उमवि नगर, जळगाव

रौप्य महोत्सवी वर्ष २०१४-१५

## महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ (बी.सी.यु.डी.)

उमवि/11A/VCRMS/अर्थसंकल्प 2015-16/अविष्कार/ Engg.& Tech./२४५/2016

दिनांक 05/08/2016

To,
① D.R./A.R. for needful.
② Dr. M. Husain, D.R.D.
13.8.16

प्रति,
प्रा.श्री.संजय सदाशिव घरडे,
माहिती व तंत्रज्ञान
शासकीय तंत्र निकेतन, रिसोड रोड,
**वाशिम**. जि.वाशिम.

**विषय** :- "कुलगुरु संशोधन प्रोत्साहन योजना" (VCRMS) या योजने अंतर्गत विद्यापीठाच्या अविष्कार मध्ये सहभागी होण्यासाठी मुदत वाढ व परवानगी बाबत .. ..

**संदर्भ**-1) विद्यापीठाचे दिनांक 10.09.2014 चे पत्र क्र NMU/11A/VCRMS/Budget-201314/Engg.&Tech./ 446/ 2014.

2) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.ससेनि-3215/प्र.क्र.280/15/तांशि-7, दिनांक 25 जुलै 2016

3) आपले दिनांक 30.7.2016 रोजीचे विनंती पत्र

**महोदय,**

वरील विषयी संदर्भांकीत पत्र क्र 01च्या अनुषंगाने आपणास आर्थिक वर्ष 2014-15 मध्ये केलेल्या तरतुदी नुसार "कुलगुरु संशोधन प्रोत्साहन योजना " (VCRMS) या योजने अंतर्गत संशोधन कार्यासाठी विद्यापीठामार्फत रक्कम रुपये 25,000/-(रुपये पंचवीस हजार मात्र) मंजूर करण्यात आलेले असुन, अनुदानाचा प्रथम हप्ता रुपये 17,000/-(रुपय सतरा हजार मात्र) अदा करण्यात आलेला होता.

वरील संदर्भांकित क्र.02 च्या अनुषंगाने माहिती व तंत्रज्ञान, शासकीय तंत्र निकेतन , महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट अ येथे आपली अधिव्याख्याता या पदावर नामनिर्देशनाने नियुक्ती झाल्याचे आपण संदर्भांकित पत्र क्र.03 अन्वये विद्यापीठास कळविले असुन, आपण केलेल्या संशोधन कार्याचा अंतीम अहवाल, दिलेल्या अनुदानाचे विनियोग प्रमाणपत्र (U.C.) , लेखा विवरण पत्रे, देयके, इ. विद्यापीठास सादर केलेली आहेत. तसेच सदर योजने अंतर्गत विद्यापीठाच्या अविष्कार स्पर्धेत सहभागी होणे सक्तीचे असल्यामुळे शैक्षणिक वर्ष 2016-17 मध्ये होणा-या विद्यापीठाच्या अविष्कार स्पर्धेत सहभागी होण्यासाठी परवानगी मागीतलेली आहे.

त्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2016-17 मध्ये विद्यापीठामार्फत आयोजित करण्यात येणा-या अविष्कार स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आपणास परवानगी देण्यात येत आहे.

"कुलगुरु संशोधन प्रोत्साहन योजना " (VCRMS) या योजने अंतर्गत विद्यापीठाच्या अविष्कार स्पर्धेत सहभागी होणे सक्तीचे असल्यामुळे कृपया आपण अविष्कार स्पर्धेत सहभाग घेवून, सहभागाचे प्रमाणपत्र विद्यापीठाच्या बी.सी.यु.डी. विभागात सादर करावे ही विनंती.

कळावे.

धन्यवाद

Inward No. 162
Date 13 AUG 2016

आपला विश्वासु
(ग.नि.पवार)
उप कुलसचिव,बी.सी.यु.डी.

**प्रत माहिती**

1.मा.प्राचार्य, एस.एस.बी.टी.चे अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय, **बांभोरी,** जि.जळगाव.
2.मा.प्राचार्य. माहिती व तंत्रज्ञान. शासकिय तंत्र निकेतन .रिसोड रोड. **वाशिम**. जि.वाशिम.

।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ

'A' Grade
(NAAC Re-accredited)
(3rd Cycle)

पत्रपेटी क्र. ८०, उमवि नगर, जळगाव

रौप्य महोत्सवी वर्ष २०१४-१५

## महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ (बी.सी.यु.डी.)

जा.क्र. उमवि/११ए/Engg.&Tech./VCRMS/देयके/२४४/२०१६

दिनांक : ०५.०८.२०१६

प्रति,
मा. वित्त व लेखा अधिकारी,
वित्त विभाग,उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगाव

To,
① D.R./A-R for needful
② Dr. M. Husain, DRD
13.8.16

**विषय : विद्यापीठाच्या सन 2013-14 च्या अर्थसंकल्पात अ.क्र. 10.02 नुसार "कुलगुरु संशोधन प्रोत्साहन योजना" Vice Chancellor Research Motivation Scheme (VCRMS) या अर्थशिर्षाखाली विद्यापीठ प्रशाळांमधील / उमविशी संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक संशोधकांचे संशोधन प्रस्तावाचे देयक अदा करणे बाबत ..**

**संदर्भ:** विद्याठाचे जा.क्र. NMU/11A/VCRMS/Budget-2013-14/Engg.& Tech./446/2014 दिनांक 10.09.2014 चे पत्र

महोदय,

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये विद्यापीठाशी संलग्नित **एस.एस.बी.टी.चे अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय,बांभोरी, जि.जळगाव.** या महाविद्यालयातील **प्रा.श्री.संजय सदाशिव घरडे, सहा.प्राध्यापक,** यांना **"Identification, Recognition, Transformation and Analysis of Modi Script"** या विषयावरील संशोधन प्रस्तावास उमविच्या सन 2014-15 च्या अर्थसंकल्पातील अ.क्र 10.02 **"कुलगुरु संशोधन प्रोत्साहन योजना " Vice Chancellor Research Motivation Scheme (VCRMS) या** अर्थशिर्षांतर्गत असलेल्या तरतूदीमधून ₹ 25,000/-(रुपये पंचवीस हजार मात्र) एकुण आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले होते. त्या पैकी Ist Installment ₹ 17,000 /- (रुपये सतरा हजार मात्र) संदर्भिय पत्रान्वये वितरीत करण्यात आलेला होता.

प्रा.श्री.संजय एस.घरडे यांनी त्यांना देण्यात आलेल्या पहिल्या हप्त्याच्या रक्कमेतच संशोधनाचे काम करुन अनुदानाचे विनियोग प्रमाणपत्र (U.C.), लेखा विवरण पत्रे, संशोधनाचा अंतीम अहवाल, संशोधन प्रबंधाची बाऊंडेड कॉपी, Soft Copy, देयके इ. दिनांक ०१.०८.२०१६ रोजी विद्यापीठास सादर केलेली असुन. पहिल्या हप्त्याच्या अग्रीमच्या रक्कमेतुन शिल्लक राहिलेली रक्कम रु. १२,०५०/-(रुपये बारा हजार पंन्नास मात्र) दिनांक ०१.०८.२०१६ रोजी पावती क्र.७१४८ अन्वये विद्यापीठात धानाकर्षाद्वारे भरणा केलेली आहे.

त्या अनुषंगाने सदर शिक्षक संशोधकाने घेतलेल्या अनुदानाचा हिशोब सादर करण्याच्या दृष्टीने-

१) लेखा परिक्षकांचे स्वाक्षरीचे खर्चाचे विवरण पत्रे-
२) Utilization Certificate- ₹ ४९५०/-
३) देयकांच्या - मुळ /छायांकित प्रती -
४) उर्वरीत रक्कम भरल्याची पावती नं.७१४८

इ.पुरक कागदपत्रे आपल्या विभागास सादर करीत आहोत.

पहिल्या हप्त्याच्या रक्कमेतच संशोधनाचे काम झालेले असल्यामुळे दुसरा हप्ता देय होत नाही. त्यामुळे पहिल्या हप्ताच्या रक्कमेतच देयकांचे समायोजन करण्यात यावे ही विनंती.

कळावे.

Inward No. 161
Date 13 AUG 2016

आपला विश्वासु,

(रा.मा. पवार)
उप कुलसचिव, बी.सी.यु.डी.

**प्रत माहिती**

1.मा.प्राचार्य, एस.एस.बी.टी.चे अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय, **बांभोरी,** जि.जळगाव.
2.मा.प्राचार्य, माहिती व तंत्रज्ञान, शासकिय तंत्र निकेतन ,रिसोड रोड, **वाशिम.** जि.वाशिम.